


RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784




वर्ष ३ रे अंक : १५६ वा मंगळवार दि. २९ जुलै २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# राजीनाम्यावरुन अजितदादा संभ्रमात आता कोकाटेंना डिपार्टमेंटच वाचवणार?

**वृत्तसंस्था/मुंबई**

गेल्या काही महिन्यांपासून सातत्यानं वादग्रस्त विधानं करणारे कृषी मंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते माणिकराव कोकाटे विधान परिषदेत अधिवेशन सुरु असताना रमी खेळत असल्यानं आणखी वादात सापडले. विरोधकांकडून त्यांच्या राजीनाम्याची मागणी होत आहे. पण उपमुख्यमंत्री अजित पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस कोकाटेंच्या राजीनाम्यावरुन द्विधा मनस्थितीत आहे. अजित पवारांच्या निकटवर्तीयांनी दिलेल्या माहितीनुसार, उपमुख्यमंत्री आणि पक्षाचे अध्यक्ष कोकाटे यांना अखेरची संधी देण्याची शक्यता आहे. मंत्री म्हणून कामगिरी सुधारा आणि वादांपासून दूर राहा, अशी समज देऊन अजित पवार तूर्तास तरी कोकाटेंना अभय देऊ शकतात. अजित पवारांनी कोकाटे यांच्या विभागाकडून कामांचा आढावा घेतलेला आहे. कृषी खात्यातील बहुतांश कर्मचारी वर्गानं कोकाटे यांच्या कार्यपद्धतीबद्दल सकारात्मक फिडबॅक दिला आहे, अशी माहिती पवारांच्या निकटवर्तीयांनी दिली. मुख्यमंत्री फडणवीस यांनी सर्व विभागांना १०० दिवसांचा कार्यक्रम आखून दिला. त्यात कोकाटे यांचा कृषी विभाग पहिल्या पाचमध्ये आला. कृषी विभागानं शेतकऱ्यांसाठी अनेक नव्या योजना राबवल्या आहेत. खुद्द मुख्यमंत्री फडणवीस हे कोकाटे यांच्या मंत्री म्हणून सुरु असलेल्या कामगिरीबद्दल समाधानी आहेत. पण त्यांच्या वादग्रस्त विधानांबद्दल फडणवीस यांची तक्रार आहे. कोकाटे यांनी मंत्रिपद स्वीकारल्यापासून खात्यात अनेक नव्या संकल्पना राबवल्या. त्यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेचा व्यापक प्रमाणावर सुरु केला. त्यामुळे खर्चाला कात्री लागली आणि उत्पादन वाढलं. एआयच्या वापरामुळे शेतकऱ्यांना अनेक फायदे होणार आहेत, अशी माहिती अजित पवारांच्या निकटवर्तीयांनी नाव प्रसिद्ध न करण्याच्या अटीवर दिली. आयएएस अधिकारी व्ही. राधा यांना माझ्या विभागात सचिव म्हणून पाठवा, अशी विनंती करणारे कोकाटे हे एकमेव मंत्री असल्याची पुस्ती त्यांनी जोडली. व्ही. राधा यांना कृषी मंत्रालयाच्या सचिव म्हणून जबाबदारी दिली जावी यासाठी कोकाटे यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांना पत्र लिहिलं होतं. बहुतांश मंत्री राधा यांची त्यांच्या विभागातून बदली व्हावी यासाठी प्रयत्नशील असतात. कारण राधा कामात भ्रष्टाचार आणि अपहार खपवून घेत नाहीत. बऱ्याच मंत्र्यांना कर्तव्यकठोर अधिकारी आवडत नाहीत. पण कोकाटे अपवाद ठरले आहेत, अशी माहिती प्रशासनातील वरिष्ठ





अधिकाऱ्यानं दिली. कोकाटे यांच्या कार्यकाळात १.२ शेतकऱ्यांच्या बँक खात्यात ४६ हजार कोटी रुपये जमा झाल्याचंही त्यांनी सांगितलं कृषी मंत्री म्हणून कोकाटे यांनी त्यांच्या खात्यासाठी अनेक चांगले निर्णय घेतलेले असले तरी त्यांच्या वादग्रस्त विधानांचीच चर्चा अधिक झाली असल्याचं राष्ट्रवादी काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यानं सांगितलं. कोकाटे यांच्या विधानांमुळे कृषी विभाग पक्षाशी जोडलाच गेलेला नाही. पक्षाचे मंत्री त्यांचं काम करताना पक्षाला कशी मदत करतात याकडे अजित पवारांचं लक्ष आहे. यासाठी कोकाटे यांनी अजित पवारांना आश्वस्त केल्यास त्यांना मंत्री म्हणून काम करण्यासाठी अखेरची संधी मिळू शकते. पण अजित पवारांचा संयम आता संपत चाललेला आहे, अशी माहिती पक्षाच्या वरिष्ठ नेत्यानं दिली. अजित पवार कृषीमंत्री कोकाटेंना अखेरची संधी देऊ शकतात. नाशिक जिल्ह्यात आणि उत्तर महाराष्ट्रात कोकाटे यांच्या रुपात नवं नेतृत्व तयार करण्याचा अजित पवारांचा प्रयत्न आहे. कोकाटे यांचा राजीनामा घेतल्यास अजित पवार विरोधकांच्या दबावासमोर झुकले असा संदेश जाऊ शकतो. दुसरे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे त्यांच्या वादग्रस्त मंत्र्यांना वाचवत असताना अजित पवारांनी कोकाटे यांचा राजीनामा घेतल्यास पक्षात चुकीचा संदेश जाण्याचा धोका आहे, असंही राष्ट्रवादीतील वरिष्ठ नेत्यानं सांगितलं.

# जिद्द आणि मेहनतीला सलाम: गरीब शेतकरी पुत्राची बॉडीबिल्डिंगमध्ये गरुडभरारी!

## ऋषिकेश हा आज अनेक तरूणांसाठी बनला प्रेरणास्थान...

**जनसंचलन/बुलढाणा**

प्रतिकूल परिस्थितीवर मात करत, गरिबीशी दोन हात करत एका शेतकरी पुत्राने बॉडीबिल्डिंग स्पर्धेत नेत्रदीपक यश मिळवून सर्वांनाच थक्क केले आहे. जिद्द, कठोर परिश्रम आणि अदम्य इच्छाशक्तीच्या बळावर त्याने हे यश संपादन केले असून, त्याच्या या प्रवासाने अनेकांना प्रेरणा दिली आहे.

ऋषिकेश विठ्ठल पवार बुलडाणा येथील एका सामान्य गरीब शेतकरी कुटुंबातून येतो. ऋषिकेश हा टायटन या जिम मध्ये परिश्रम मेहनत घेतली.




पण त्याने आपल्या ध्येयापासून लक्ष विचलित होऊ दिले नाही. त्याच्या या संघर्षाला अखेर यश मिळाले. नुकत्याच मुंबई येथे झालेल्या Overall India level ( मसलमेन इंडिया नॅचरल बॉडी बिल्डिंग स्पर्धेत त्याने Men's physique कॅटेगरी मध्ये पहिला क्रमांक, व classic physique मध्ये दुसरा क्रमांक पटकावून सर्वांनाच आश्चर्याचा धक्का दिला.

ऋषिकेश याच्या यशाने त्याच्या कुटुंबियांना आणि संपूर्ण मित्र परिवाराला आनंद झाला आहे. त्याच्या या प्रवासातून एकच गोष्ट सिद्ध होते की, जर मनात जिद्द असेल आणि कठोर परिश्रमाची तयारी असेल, तर कोणतीही परिस्थिती तुम्हाला तुमच्या स्वप्नांपासून दूर ठेवू शकत नाही. ऋषिकेश हा आज अनेक तरुणांसाठी प्रेरणास्थान बनला आहे. त्याचे हे यश हे केवळ त्याच्या एकट्याचे नसून, प्रतिकूल परिस्थितीतही हार न मानणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या जिद्दीचे प्रतीक आहे. सुशील इंगळे यांनी त्याला नेहमी साथ दिली तर सख्या भावासारखा जीव लावून तिथे उभा करण्यात विजय धामोडे यांचा सुद्धा पाठिंबाआहे.

# ...कमी झालेला दुरावा...

## संपादकीय लेख

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे मालदीवमध्ये झालेले भव्य स्वागत आणि त्यांना तिथे मिळालेला प्रतिसाद पाहता, मध्यंतरी दोन्ही देशांत निर्माण झालेला दुरावा कमी झाला, असे म्हणता येईल. हिंदी महासागरातील द्वीपसमूह असलेला मालदीव बऱ्यापैकी भारतावर अवलंबून असला आणि आजवर त्याच्या गरजेच्या वेळी भारत मदतीला धावून गेला असला, तरी तेथील जनतेला भारताच्या विरोधात प्रक्षोभित करण्याच्या राजकारणामुळे दोन्ही देशांतील संबंधांत वितुष्ट आले होते. अध्यक्ष महंमद मुइझ्झू यांनी २०२३मधील तेथील निवडणुकीत भारतद्वेषाचे राजकारण खेळले. सत्तेवर आल्यावरही त्यांनी प्रारंभी भारतविरोधी धोरणे राबविण्यास सुरुवात केली. मालदीवमध्ये असलेले भारतीय लष्कराचे तळ हलविण्याचा आग्रह धरला. तेथील काही मंत्र्यांनी पंतप्रधान मोदींच्या विरोधात आक्षेपार्ह विधाने केली. दुसरीकडे मुइझ्झू यांनी चीनमध्ये नवा साथीदार शोधला. एरवी मालदीवचे अध्यक्ष सत्तेवर येताच भारताच्या दौऱ्यावर येतात; परंतु मुइझ्झू यांनी चीनचा दौरा केला. भारताच्या सर्व शेजारी देशांमध्ये आपले सामरिक हितसंबंध निर्माण करणाऱ्या चीनसाठी मालदीवमधील घडामोडी पथ्यावर पडणाऱ्या होत्या. या सर्व कारणांमुळे भारत आणि मालदीव यांच्यातील संबंध विकोपाला गेले. इतके, की मालदीवला सहलीसाठी जाण्यावर बहिष्कार घालण्याची चळवळ काही भारतीय पर्यटकांनी चालविली. एकीकडे हे घडत असतानाही मालदीवबरोबरील संबंधांत सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न मोदी सरकारकडून सुरू होता. शेजारी देश आपल्यापासून फार दूर जाऊन चालणार नाही, या वास्तवाची जाणीव त्यामागे होती. त्यामुळे मालदीवच्या प्रतिकूल भूमिकेला भारताने संयत प्रतिसाद दिला. दरम्यानच्या काळात मुइझ्झू यांनाही भारताच्या सातत्यपूर्ण मदतीची आणि चीनच्या बेभरवशाची जाणीव झाली असावी. या दौऱ्यात मोदी यांनी मालदीवला ४८५० कोटी रुपयांचे कर्ज देण्याचे जाहीर केले. त्याचबरोबर दोन्ही देशांत मुक्त व्यापार सुरू करण्याबाबत चर्चाही झाली. व्यापारासह संरक्षण आणि पायाभूत सुविधा या क्षेत्रांतील सहकार्य वाढविण्यावरही भर दिला. भारताने मालदीवच्या हाकेला नेहमीच ओ दिल्याचे मोदींनी आवर्जून सांगितले. हे धोरण पुढेही चालू राहणार असल्याचे सांगून मोदींनी मध्यंतरीच्या काळातील वितुष्टतेचे प्रकरण मागे पडल्याचे सूचित केले. मालदीवचे अध्यक्ष मुइझ्झू गेल्या ऑक्टोबरमध्ये भारताच्या दौऱ्यावर आले होते,



त्या वेळीच याची सुरुवात झाली होती. दोन्ही देशांमध्ये द्विपक्षीय संबंधांचा ङ्गनवीन अध्यायफ सुरू होत असल्याचे तेव्हा नमूद करण्यात आले होते. या अध्यायाचे पुढचे प्रकरण मोदी यांच्या मालदीव दौऱ्याद्वारे लिहिले गेले आहे. मुइझ्झू अध्यक्ष झाल्यानंतर मालदीवमध्ये जाणारे पहिले नेते होण्याचा मान मोदींना मिळाला. मालदीवला कर्जपुरवठा करण्याचा मुद्दा महत्त्वाचा आहे. यापूर्वीही भारताने मालदीवला दिवाळखोरीच्या उंबरठ्यावरून वाचविले आहे. भारताच्या सहकार्यामुळे मालदीव सशक्त होण्यास मदत होणार असल्याचे मुइझ्झू यांनी आवर्जून नमूद केले. मालदीवला आवश्यक असलेले सर्व साहित्य भारताकडून विनाअडथळा मिळत असल्याबद्दलची कृतज्ञता मुइझ्झू यांनी व्यक्त केली. अन्य देशांशी संबंध प्रस्थापित केले, तरी भारताशिवाय पर्याय नसल्याचेच त्यांनी एक प्रकारे कबूल केले. मालदीवशी असलेल्या संबंधांतील सुधारणा हे मोदी सरकारच्या परराष्ट्र धोरणाचे यश आहे. नेपाळ, श्रीलंका, बांगलादेश या शेजारी देशांना मदत करून आणि तिथे आपले सामरिक संबंध निर्माण करून भारताची कोंडी करण्याचे धोरण चीन गेल्या दोन दशकांपासून राबवीत आला आहे. त्यामुळे शेजारी देश भारतापासून लांब जात असल्याचे चित्र निर्माण झाले. मात्र, चीनच्या मदतीचे रूपांतर हळहळू विळख्यात होते, याचा अनुभव हे देश घेत आहेत. करोना साथरोगानंतर श्रीलंकेत आर्थिक अरिष्ट आले, त्या वेळी भारतच श्रीलंकेच्या मदतीला धावून गेला. तेव्हापासून भारत आणि श्रीलंका यांच्यातील नजीकता वाढली आहे.

# डॉक्टरांच्या प्रसंगावधानामुळे बालकांचे प्राण वाचले: गिळलेली नाणी आणि बॅटरी एंडोस्कोपीने काढली !

# डॉक्टर अभिलाष माळी यांचे सर्व स्तरावरून होतंय कौतुक...

**जनसंचलन/बुलढाणा**

बुलढाणा शहरातील सुप्रसिद्ध डॉक्टर अभिलाष माळी यांनी केलेल्या दोन वेगवेगळ्या यशस्वी शस्त्रक्रियांबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे. डॉक्टरांच्या प्रसंगावधानामुळे आणि कौशल्यामुळे दोन बालकांचे प्राण वाचले आहेत.

यामध्ये तीन वर्षीय बालकाने पाच रुपयाची नाणी गिळली तर आठ वर्षीय मुलीने घड्याळाची बॅटरी सेल गिळला. या दोन्ही मुलांनी खेळता-खेळता नाणी आणि बॅटरी गिळली होती, ज्यामुळे त्यांच्या जीवावर बेतले असते, परंतु डॉक्टरांनी एंडोस्कोपीद्वारे ती सुरक्षितपणे बाहेर काढली. पहिल्या घटनेत, एका तीन वर्षांच्या मुलाने खेळता-खेळता चुकून नाणे गिळले. पालकांनी त्वरित त्याला रुग्णालयात दाखल केले. डॉक्टरांनी तातडीने तपासणी केली आणि एंडोस्कोपीद्वारे नाणे यशस्वीरित्या बाहेर काढले. यामुळे मुलाला मोठा दिलासा मिळाला आणि त्याचा जीव वाचला. दुसऱ्या घटनेत, एका ८ वर्षाच्या मुलीने खेळताना सेल (बॅटरी) गिळला. बॅटरी गिळल्याने शरीरात रसायनांची गळती




होऊन गंभीर हानी पोहोचू शकते, हे लक्षात घेता डॉक्टरांनी परिस्थितीचे गांभीर्य ओळखले. त्यांनी तत्काळ एंडोस्कोपी शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला. अत्यंत काळजीपूर्वक ही शस्त्रक्रिया पार पडली आणि बॅटरी सुरक्षितपणे बाहेर काढले.

गिळलेली बॅटरी ही धोकादायक व गंभीर स्वरूपाची इजा आतड्याला व पोटाला करू शकतात जी एका विशिष्ट वेळ आधी काढणे गरजेचे असते आणि त्यात डॉक्टर अभिलाष माळी यांना यश आले. या घटनेत मुलींची नातेवाईक छत्रपती संभाजी नगरला जायला निघाले होते पण वेळेच्या कमतरतेमुळे बुलढाणा कडे त्यांनी धाव घेतली व डॉक्टर अभिलाष माळी यांनी तत्परतेने उपचार करून बालेकिचे प्राण वाचवले. या दोन्ही घटनांमध्ये, वेळेवर मिळालेले वैद्यकीय उपचार आणि डॉक्टरांनी दाखवलेले कौशल्य यामुळे दोन्ही बालकांचे प्राण वाचले. अशा प्रकारच्या घटनांमध्ये पालकांनी त्वरित वैद्यकीय मदत घेणे किती महत्त्वाचे आहे, हे यातून पुन्हा एकदा अधोरेखित होते. यावेळी डॉक्टर अभिलाष माळी यांच्या या यशस्वी शस्त्रक्रियेची सर्वत्र चर्चा सुरू आहे आणि त्यांचे सर्व ठिकाणाहून कौतुक करण्यात येत आहे. डॉक्टर अभिलाष माळी यांनी बालकांच्या पालकांना अशा वस्तू मुलांच्या आवाक्याबाहेर ठेवण्याचे आणि त्यांची विशेष काळजी घेण्याचे आवाहन केले आहे.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# मुंबई–गोवा महामार्ग ठप्प, हातखांब येथे गॅस टँकर पुलावरून खाली कोसळला...

**रत्नागिरी:** मुंबई गोवा महामार्गावर सातत्याने गॅस टँकर अपघात घडत आहेत. गेल्या दोन-तीन महिन्यात असे अपघात घडले आहेत.आज पुन्हा काही वेळापूर्वी रात्रीच्या सुमारास हा मोठा अपघात घडला आहे. या घटनेत गॅसचा टँकर थेट पुलावरून कोसळल्याने मुंबई गोवा महामार्गावरील वाहतूक ठप्प झाली आहे या अपघाताचे वृत्त कळताच पोलीस प्रशासन व सुरक्षा यंत्रणांनी घटनास्थळी धाव घेऊन आवश्यक त्या उपाययोजना तात्काळ सुरू केल्या आहेत. याचाच भाग म्हणून काही नागरिकांनाही सुरक्षिततेसाठी स्थलांतरित करण्यात आले आहे.मुंबई गोवा महामार्गावरून जाणार गॅस टँकर रत्नागिरीतील हातखांब येथील शाळेजवळ पुलावरून खाली कोसळला. ही घटना सोमवारी रात्री ११.१५ च्या सुमारास घडल्याची माहिती समोर येत आहे. गॅस लिकेज झाल्याची




प्राथमिक माहिती असून स्फोटाचा धोका असल्याने त्याठिकाणी सतर्कता बाळगली जात आहे. यंत्रणा कार्यान्वित झाल्या आहेत. खबरदारी म्हणून मुंबई गोवा महामार्गावरील दोन्ही बाजूची वाहतूक बंद केली गेली आहे. नागरिकांनी या परिसरात न जाण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तसेच वाहतूकीसाठी पर्यायी मार्गाचा वापर करण्याचे आवाहनही केले गेले आहेदरम्यान महामार्गावर पलटी झालेल्या टँकरप्रकरणी एक मोठी अपडेट समोर येत आहे. टँकरमधून लिकेज होणारा गॅस हा थांबवण्यात जिल्हा प्रशासन व पोलीस प्रशासनाला मोठ यश आल आहे. मात्र या पलटी झालेल्या टँकरमधून गॅस रिकामा करण्याची प्रक्रिया सुरू आहे. त्यामुळे महामार्गावरील वाहतूक अद्यापही बंद राहणार आहे. हा गॅस टँकर रत्नागिरी कडून गोव्याच्या दिशेने निघाला होता त्याच वेळी रस्त्याचा अंदाज न आल्याने अवघड वळणावर हा अपघात झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. सुरक्षेचा उपाय म्हणून ३० ते ४० घरातील नागरिकांना आजूबाजूच्या हॉटेल मध्ये तसेच निवळीपर्यंत हलवण्यात आल्याची माहिती आहे.या सगळ्या घटनेचे तात्काळ गांभीर्य लक्षात घेऊन जिल्हा पोलीस अधीक्षक नितीन बगाटे हे पोलिस यंत्रणा व सुरक्षा यंत्रणेचा फौज फाटा घेऊन घटनास्थळी दाखल झाले. हा भीषण . मुंबई- गोवा महामार्गावर वाहतूक पूर्णपणे थांबवण्यात आली असून ती पर्यायी मार्गाने वळवण्यात आली आहे.

टँकर मधील लिकेज होत असलेला गॅसच्या ठिकाणी पाण्याचा मारा करण्यासाठी तीन ते चार बंब घटनास्थळी दाखल झाले . यामध्ये नगरपरिषद व एमआयडीसीच्या अग्निशमन दलाचे बंबही दाखल झाले. जिल्हा पोलीस अधीक्षक नितीन बगाटे यांच्या समवेत अपर जिल्हा पोलीस अधीक्षक बाबुराव महामुनी, स्थानिक गुन्हा अन्वेषण शाखेचे नितीन ढेरे, रत्नागिरी शहर व रत्नागिरी ग्रामीणचे पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी तसेच अन्य सुरक्षा यंत्रणा घटनास्थळी तैनात आहेत.

दरम्यान महामार्गावरती अशा स्वरूपाचे अपघात अलीकडे सातत्याने घडू लागले आहेत. हातखंब्याजवळच निवळी येथेही दोन महिन्यापूर्वी भीषण अपघात झाला होता या अपघातात गॅस टँकर व ट्रॅव्हल्स यांच्यात झालेल्या अपघातात चिपळूण परिसरातील जवळपास २५ ते ३० शिक्षक जखमी झाले होते त्यावेळी मुंबई गोवा महामार्गावर वाहतूक जवळपास १४ ते १५ तास तास बंद ठेवावी लागली होती.

# पुण्यात २३ वर्षीय आयटी इंजिनिअरने आयुष्य संपवलं, वेदनादायी अंत; शेवटच्या चिठ्ठीत म्हणाला माझ्या मृत्यूस

**पुणे :** २३ वर्षीय आयटी अभियंत्याने आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना पुण्यात उघडकीस आली आहे. हिंजवडी फेज एक येथील अॅटलास कॉपको कंपनीच्या सातव्या मजल्यावरुन तरुणाने उडी मारली. पीयूष कवडे असे मयत आयटी इंजिनिअर तरुणाचे नाव आहे.ही घटना सोमवार, २८ जुलै रोजी दुपारी घडली. झमाझ्या मृत्यूस कोणालाही जबाबदार धरु नये अशा आशयाची चिठ्ठी या अभियंत्याने लिहून ठेवली आहे. पीयूष अशोक कवडे, वय २३ वर्ष, रा. वाकड, मूळ रा. नाशिक, असे आत्महत्या केलेल्या अभियंता तरुणाचे नाव आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीयूष अॅटलास कॉपको कंपनीत गेल्या वर्षभरापासून इंजिनिअर म्हणून नोकरी करत होता. सोमवारी सकाळी कंपनीच्या सातव्या मजल्यावरुन उडी घेत त्याने आयुष्याची अखेर केली.माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला आणि तरुणाचा मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला. घटनास्थळी सापडलेल्या सुसाइड





नोटमध्ये कोणताही संशय व्यक्त केलेला नाही. आत्महत्येचं नेमकं कारण स्पष्ट झालेलं नसलं, तरी वैयक्तिक कारणांतून केल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. हिंजवडी पोलिस या प्रकरणाचा अधिक तपास करीत आहेत.शनी शिंगणापूर देवस्थानचे माजी विश्वस्त आणि विद्यमान उप कार्यकारी अधिकारी नितीन सूर्यभान शेटे, वय ४३ वर्ष, रा. शनी शिंगणापूर, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर, यांनी सोमवारी आत्महत्या केली. गळफास लावून घेतलेल्या अवस्थेतील त्यांचा मृतदेह त्यांच्या घरी आढळून आला. सध्या शनी शिंगणापूर देवस्थानच्या विश्वस्त मंडळांसंबंधी विविध वाद चालू असून त्याची सुनावणी धर्मादाय आयुक्तांकडे सुरु आहे. या प्रकरणाशी त्यांच्या आत्महत्येचा संबंध आहे का, अशी चर्चा असताना पोलिसही त्या अनुषंगाने तपास करीत आहेत.नितीन शेटे यांनी आत्महत्या करण्यापूर्वी कोणतीही चिठ्ठी लिहून ठेवलेली नाही. त्यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी आणि मुलगा असा परिवार आहे. घरात कोणी नसताना त्यांनी गळफास घेतला. मुस्लिम कर्मचाऱ्यांना कामावर ठेवणे, अतिरिक्त आणि बोगस कर्मचारी भरती, बनावट मोबाइल अप्लिकेशनद्वारे भाविकांची फसवणूक यामुळे गेल्या काही काळापासून देवस्थान चर्चेत आहे.

# जुन्या वादाने घात केला, एका रात्रीत दोघांचा जीव घेतला; नागपुरात खळबळ...

**नागपूर :** उपराजधानी नागपूर शहरात रविवारी रात्री अवघ्या काही तासांच्या अंतरावर दोन हत्या झाल्याने संपूर्ण शहरात खळबळ उडाली आहे. दोन भागांत घडलेल्या या दुहेरी खून प्रकरणामुळे नागपूर शहर पुन्हा एकदा गुन्हेगारीच्या छायेखाली आल्याचे चित्र निर्माण झाले आहे. या घटनांनी पोलीस यंत्रणेच्या कार्यक्षमतेवरही अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत. कायदा आणि सुव्यवस्थेच्या दृष्टीने संवेदनशील मानल्या जाणाऱ्या नागपूर शहरात एका रात्रीत दोन हत्या होणे, ही चिंतेची बाब ठरू लागली आहे.पहिली घटना नागपूरच्या मध्यवर्ती भागात असलेल्या लकडगंज पोलीस ठाण्याच्या हद्दीतील जुनी मंगळवारी परिसरातील गुजरी चौकात घडली. जुन्या वैमनस्यातून चार आरोपींनी हर्षल अनिल सौदागर (वय २४) या युवकावर चाकूने हल्ला करून त्याचा खून केला. आरोपी प्रज्वल कनारकर, प्रज्वल डोरले, वैभव हेडाऊ आणि राहुल शेटे हे चौघेही स्थानिक रहिवासी असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहे.वृत्तानुसार, हर्षल आणि मुख्य आरोपी प्रज्वल कनारकर यांच्यात काही दिवसांपूर्वी वाहन उचलण्यासंबंधी वाद झाला होता. मित्रांनी मध्यस्थी करून वाद मिटवला होता. मात्र, त्यात दडपलेला राग रविवारी रात्री पुन्हा उफाळून आला. रात्री प्रज्वल कनारकर आणि त्याचे तीन मित्र गुजरी चौकात बसले असताना, हर्षल दुचाकीवर तिथे पोहोचला आणि चारही आरोपींना धडक देण्याचा प्रयत्न केला. यावरून वाद उफाळून निघाला आणि हर्षलने शिवीगाळ केली. वादाचे रूपांतर हाणामारीत झाले. याचदरम्यान प्रज्वल कनारकर घरात जाऊन चाकू घेऊन आला आणि हर्षलच्या गळ्यावर सपासप वार केले. रक्तबंबाळ अवस्थेतील हर्षलला तात्काळ शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. घटनेनंतर आरोपी घटनास्थळावरून फरार झाले होते.

# महापालिकेच्या तोंडावर राज मातोश्रीवर, युती निश्चित...

## उपराजधानीत ठाकरेंच्या शिवसेनेसमोर तीन आव्हानं कोणती?

**नागपूर :** प्रदीर्घ काळापासून युतीच्या भरवशावर खेळणाऱ्या शिवसेनेला यावेळी महापालिकेत शक्ती दाखवण्याची संधी चालून आलेली आहे. एकाच महानगर प्रमुखाचा नवा वाद सुरू झाला असला तरी, शिवसैनिक उत्साहात असून आज, रविवारी उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवशी मनसेचे सर्वेसर्वा राज ठाकरे यांनी दिलेल्या शुभेच्छा म्हणजे दुधशर्करा योग असल्याची भावना व्यक्त होऊ लागली. भाजप-शिवसेना युती अनेक वर्षांपासून राहिली. २०१४ साली विधानसभा निवडणुकीत युती तुटल्यानंतर परत सत्तेसाठी ती झाली. यानंतर २०१७ साली महापालिका निवडणुकीत ऐनवेळी दोन्ही पक्ष स्वतंत्र लढले. शिवसेनेला ऐनवेळी बसलेल्या धक्क्यामुळे उमेदवारदेखील मिळाले नाहीत. युतीमुळे शिवसेनेला शहरात पक्षाचे जुने चिन्ह धनुष्यबाण पोहोचवता



आले नाही व जागाही बोटावर मोजण्या इतक्यात मिळाल्या. भाजपचा बालेकिल्ला म्हणून उदयास आलेल्या उपराजधानीत मनभेद दूर करणे, मशाल चिन्ह पोहोचवणे व दोनअंकी नगरसेवक निवडून आणण्याचे आव्हान पक्षासमोर आहे.राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाप्रमाणे (शप) ठाकरे गटाने धडा शिकून स्वबळाची तयारी सुरू केली. २०२२ साली महाआघाडी असतानादेखील स्वबळाचे प्रयत्न झाले त्यावेळी पक्षात फूट पडलेली नव्हती. दरम्यान, निवडणूक टळली आणि सुरत, गुवाहाटी असा दुसऱ्या गटाचा प्रवास झाला.शिवसेनेने गेल्यावेळी संघटनात्मक बदल करताना दोन महानगर प्रमुख दिले. त्यापूर्वी जिल्हाप्रमुख असे पद होते. शहरात दोन नेतृत्वांमध्ये तीन-तीन विधानसभा मतदारसंघ असे विभाजन करण्यात आले. दक्षिण नागपूरवरून प्रमोद मानमोडे व किशोर कुमेरिया यांच्यात रस्सीखेच झाली. अखेर मानमोडे यांच्याकडे हा मतदारसंघ आला.ठाकरे गटातून मोठ्या प्रमाणात आउटगोइंग झाले असले तरी, बऱ्यापैकी शिवसैनिक आजही पक्षासोबत आहेत. मध्यंतरी असणारी अस्वस्थता आता दूर होत आहे.

मात्र, संघटनेत एकच महानगर प्रमुखपद असावे, अशी शिवसैनिकांची भावना आहे. हा नवा वाद स्थानिक पातळीवर उद्भवल्याने आता मुंबईत मातोश्रीला याची कल्पना द्यावी लागेल. संपर्कनेते भास्कर जाधव, सचिव विनायक राऊत आदी नेते हा तिढा कसा सोडवतात याकडे शिवसैनिकांचे लक्ष लागले आहे.पक्षाने अलीकडेच माजी जिल्हाप्रमुख व पूर्व विदर्भाचे सहसंघटक सतीश हरडे यांची महानगर संपर्क प्रमुखपदी नियुक्ती केली. त्यांनी लगेच समन्वयक साधण्यासोबतच प्रभाग, शाखाप्रमुख नाही तिथे नियुक्ती सुरू केली. आधी नियुक्त झालेल्यांना कामाला लावले. उपविभाग प्रमुख व अन्य पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्यांसाठी यादी तयार केली जात आहे. अर्थात मुंबईतून घोषणा होईल.पक्षाकडून प्रभाग आणि शाखाप्रमुखांची बांधणी सुरू झाली आहे. गेल्या निवडणुकीत शिवसेनेचा मतटक्का वाढला. चौदा जागांवर आम्ही दुसऱ्या स्थानावर होतो. किशोर परातेंसारखे तीन उमेदवार अल्प मतांनी पराभूत झाले. त्यामुळे महाआघाडीत सन्मानजनक जागा मिळाव्यात, अशी आमची अपेक्षा आहे. अन्यथा, स्वबळावर लढण्याची आमची तयारी राहील. अर्थात पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशानुसारच निवडणूक लढण्यात येईल, असे नागपूर लोकसभा संपर्क प्रमुख सतीश हरडे यांनी सांगितले.

# टाकीवर बसली, मिठी मारली अन्... पुण्यात चालत्या दुचाकीवर जोडप्याचे अश्लील चाळे

**पुणे:** विद्येचं मंदिर म्हणून ओळख असलेल्या पुणे शहरातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. येथे एक जोडपं धावत्या दुचाकीवर प्रवास करत असताना अश्ली चाळे करताना दिसून आले. दुचाकीवरून प्रवास करत असताना हे जोडपं रोमान्सच्या नावाखाली अश्लील चाळे करत असल्याचं कॅमेऱ्यात कैद झालं आहे. व्हिडिओमध्ये दिसत आहे की, महिला दुचाकीच्या टाकीवर पुरुषाच्या दिशेने तोंड करून बसली आहे, तर पुरुष दुचाकी चालवत आहे. ज्याचा व्हिडिओ आता व्हायरल झाला आहे. हा सर्व प्रकार पुण्यातील शिंदेवाडी भागात घडला असून, खेड-शिवापूर परिसरातील रस्त्यावर हे जोडपे चाळे करत होते, अशी माहिती आहे. सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या व्हिडिओमध्ये एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, हा व्हिडिओ पुण्यातील शिंदेवाडी भागातील आहे. खेड-शिवापूर परिसरातील रस्त्यावर हे जोडपे दुचाकीवर रोमान्स करत होते. व्हिडिओमध्ये दिसत आहे की, पुरुष दुचाकी चालवत आहे आणि महिला दुचाकीच्या टाकीवर पुरुषाकडे तोंड करून बसलेली आहे. रस्त्यावरून जात असताना या जोडप्याचे अश्लील चाळे सुरू होते.महिला आधी टाकीवर झोपते आणि नंतर पुरुषाला मिठी मारते. विशेष म्हणजे महिलेने तोंडावर मास्क लावला आहे. पाठीमागून येत असलेल्या एका दुचाकीस्वाराने हे दृश्य



पाहिलं आणि त्यांनी हा व्हिडिओ शूट केला. बरेच अंतर पुढे जाईपर्यंत या जोडप्याचे हे चाळे सुरू होते. गर्दीच्या रस्त्यावर रोमान्सच्या नावाखाली हे जोडपं जीव धोक्यात घालून अशाप्रकारे अश्लील चाळे करत होते. या घटनेनंतर सोशल मीडियावर उलट-सुलट प्रतिक्रिया येत आहेत. हे अति प्रेम आहे की, प्रेमाच्या नावावर अश्लिलता, असा प्रश्नही काहीजणांनी विचारला आहे.या घटनेमुळे अनेक प्रश्न उभे राहिले आहेत. भर रस्त्यात, वाहनांची वर्दळ असताना, अशा प्रकारे जीव धोक्यात घालून कृत्य करणे योग्य आहे का, असा सवाल विचारला जात आहे. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला आहे. या घटनेवर अनेक नागरिकांनी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत. अनेकांनी या जोडप्याच्या बेजबाबदार वर्तनावर नाराजी व्यक्त केली आहे.

# छत्रपती संभाजीनगरात १८ वर्षीय तरुणीने संपवलं जीवन

## स्नॅप चॅटवर सापडले मेसेज, धक्कादायक कारण समोर

**छत्रपती संभाजीनगर:** भावसिंगपुऱ्यातील प्रांरंभी इंगळे (वय १८, रा. भीमनगर, भावसिंगपुरा) हिने १९ जुलैला गळफास घेऊन आत्महत्या केली. आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी तिचा मित्र सचिन राजु भिसे (वय १९, रा. मिलकॉर्नर) याच्याविरोधात छावणी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. सचिन ब्लॅकमेल करून मानसिक त्रास देत होता व त्रासाला कंटाळूनच तिने आत्महत्या केल्याचे पालकांनी केलेल्या तक्रारीत नमूद केले आहे.या प्रकरणी मृत मुलीची आई सुजाता इंगळे ( वय ३९, रा. भिमनगर, भावसिंगपुरा) यांनी फिर्याद दिली. त्यानुसार, प्रांरभी ही समर्थनगर येथील खासगी रुग्णालयात ऑपरेशन टेक्निशियन प्रशिक्षक म्हणून कार्यरत होती. रुग्णालयात काम करीत असताना तिची ओळख सचिन याच्याशी




झाली होती. त्यानंतर दोघे प्रेमात पडले. प्रांरभीच्या घरच्यांनी सुरुवातीला लग्नासाठी संमती दिली होती. मात्र, सचिनला चांगली नोकरी नसल्याने प्रांरभीचे वडील दीपक यांनी विरोध करून लग्नाचा प्रस्ताव नाकारला.त्यानंतरही प्रांरभी आणि सचिन यांच्यात संपर्क सुरूच होता. दरम्यान, आरोपी सचिनयाने वेळोवेळी प्रांरभीकडून आणि तिच्या आईकडून पैशांची मागणी केली होती. त्याने एकदा गाडी खरेदीसाठी २० हजार रुपये मागितले, त्याला तीन हजार रुपये रोख दिल्याचेही त्यांच्या तक्रारीत नमूद आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!


# ट्रेंड वैयक्तिक उत्पादनांचा!



सर्वांसाठी एकाच प्रकारचं सौंदर्यप्रसाधन विकण्यापेक्षा प्रत्येक ग्राहकाच्या गरजेनुसार त्याच्या त्वचेला लागू पडेल, अशा प्रकारचं वैयक्तिक सौंदर्यप्रसाधन तयार करण्याचा ट्रेंड बाजारपेठेत रुजतोय. अनेक स्टार्ट-अप कंपन्या ही नवी संकल्पना घेऊन बाजारपेठेत येत आहेत. या ट्रेंडचं उज्वल भवितव्य लक्षात आल्यामुळे आजच्या आघाडीच्या कंपन्यांनीही अशा कंपन्यांमध्ये गुंतवणूक करण्यास सुरुवात केली आहे. या नव्या ट्रेंडविषयी..

मार्केटिंगच्या क्षेत्रात कायम बदल होत असतात आणि आपली उत्पादनं खपवण्यासाठी कंपन्या नवनवीन क्लृप्त्या लढवत असतात. सध्याचं युग हे पर्सन्लायझेशनचं आहे. अगदी समाजमाध्यमांवर दिसणा-या जाहिरातीही आपल्या आवडी-निवडी लक्षात घेऊन दाखवल्या जातात. त्यामुळे प्रत्येकाला दिसणा-या जाहिराती वेगळ्या असतात. पण, आता चक्क उत्पादनांमध्येही पर्सन्लायझेशन येऊ घातलं आहे. म्हणजे पूर्वी फक्त पानवाला किंवा पाणीपुरीवाला प्रत्येक ग्राहकाला हवं तसं पान किंवा पाणीपुरी तयार करून देत असे. आता चक्क ग्राहक स्वत:ला हवी तशी सौंदर्यप्रसाधनंही कंपन्यांकडून तयार करून घेऊ शकतो! तंत्रज्ञानाच्या बळावर हे शक्य झालं आहे. काही स्टार्ट-अप कंपन्यांनी केवळ जाहिराती करून आपली उत्पादनं विकण्यापेक्षा ग्राहकांच्या अधिक जवळ जाण्यासाठी तंत्रज्ञानाची मदत घेतली आहे. स्किन क्राफ्ट, फ्री विल, बेअर ॲनाटॉमी आणि वेदिक्स अशा काही कंपन्यांनी पाश्चिमात्य देशांमध्ये लोकप्रिय झालेला असा ट्रेंड देशात आणला आहे. याला डायरेक्ट टू कन्झ्युमर अथवा डीटीसी असं म्हटलं जातं.

बोस्टन कन्सिल्टग ग्रुपने केलेल्या एका सर्वेक्षणामध्ये शहरी ग्राहकांपैकी ५६ टक्के ग्राहकांनी अशा प्रकारच्या पर्सन्लाईज्ड सौंदर्यप्रसाधनांना पसंती दर्शवली आहे. त्यांनी अशा उत्पादनांसाठी अधिक पैसे मोजण्याचीही तयारी दाखवली आहे. टेन ट्रेंड्स दॅट आर अल्टिरग कन्झ्युमर बिहेवियर इन इंडिया अर्थात देशातल्या ग्राहकांची मानसिकता बदलणारे दहा ट्रेंड्स हा सर्वेक्षणाचा विषय होता. यातून आणखीही काही निष्कर्ष काढण्यात आले आहेत. त्यात महत्त्वाचं म्हणजे, ५० टक्के ग्राहकांना आंतरराष्ट्रीय ब्रँड्सपेक्षा देशी ब्रँड्सची सौंदर्यप्रसाधनं घेण्यात अधिक रस दिसून आला. सौंदर्यप्रसाधनांची बाजरपेठ पूर्णत: मार्केटिंगच्या अर्थात जाहिरातींच्या आधारे चालते. अशा बाजारपेठेत ग्राहकांशी संवाद साधून आपल्याबद्दल आत्मीयता निर्माण करून स्वत:चं वेगळं स्थान तयार करण्यासाठी या कंपन्या डेटा सायन्स आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स या तंत्रज्ञानाचा वापर करत आहेत.

या कंपन्या ग्राहकांना एक ऑनलाईन प्रश्नावली भरायला सांगतात. त्यातून ग्राहकांच्या गरजा आणि अपेक्षा जाणून घेतल्या जातात. प्रत्येक ग्राहकासाठी वेगळं सौंदर्यप्रसाधन तयार करण्यासाठी त्या ग्राहकाचं राहण्याचं ठिकाण, तिथलं वातावरण, ग्राहकाची जीवनशैली, त्यांची रंग आणि सुगंधांची आवड याची माहिती घेऊन एका सॉफ्टवेअरमध्ये टाकली जाते. सॉफ्टवेअरमधून त्या ग्राहकासाठी आपोआप योग्य फाम्र्युला तयार होतो. त्या फॉम्र्युल्यानुसार ते खास उत्पादन तयार केलं जातं. काही कंपन्या त्या उत्पादनाच्या पॅकिंगवर ग्राहकाचं नाव टाकून देण्याची सुविधाही पुरवतात. आपल्या नावाने तयार झालेलं उत्पादन वापरून ग्राहकाला त्या कंपनीबद्दल आत्मीयता (सेन्स ऑफ बिलाँगिंगनेस) वाटायला लागते.

फ्री विल या कंपनीचे सहसंस्थापक मोहित यादव यांना गेल्या अनेक वर्षांमध्ये सौंदर्यप्रसाधनांच्या बाजारपेठेत फारसे बदल झाल्याचे दिसत नव्हते. अगदी शॅम्पूची सुरुवात झाल्यापासून उत्पादनांमध्ये फारसं नावीन्य पाहायला मिळत नव्हतं. कोणत्याही कंपनीमध्ये एखाद्या उत्पादनाच्या मुख्य घटकाबद्दल एखादी मार्केटिंग स्टोरी तयार केली जाते आणि मग त्यानुसार ते उत्पादन तयार केलं जातं. उदा. कोलगेटने आपल्या टूथपेस्टमध्ये मीठ किंवा कोळसा असल्याची जाहिरात केली. या जाहिरातीची संकल्पना आधी तयार झाली आणि मग ती टूथपेस्ट तयार झाली. या संकल्पना दर सहा महिन्यांनी बदलत असतात.

जगात सौंदर्यप्रसाधनांची बाजारपेठ ५३२ अब्ज अमेरिकन डॉलर्स एवढी मोठी आहे. त्या मानाने भारतातली ही बाजारपेठ पाच टक्क्यांहूनही कमी आहे. अर्थात देशाच्या बाजारपेठेत आता नायका, शुगर कॉस्मेटिक्स, माय ग्लॅम, बॉम्बे शेव्हिंग कंपनी, द मॅन कंपनी अशा अनेक स्टार्ट अप कंपन्यांनी प्रवेश केला आहे. केवळ प्रवेशच केलेला नाही, तर बाजारपेठेत आपलं नाव गाजवायलाही सुरुवात केली आहे. या कंपन्यांनी जुन्या आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठी नावं असलेल्या लॉरियल, युनिलिव्हर, प्रॉक्टर अँड गॅंबल तसंच विप्रो, गोदरेज, मेरिको, डाबर आणि इमामी या भारतीय कंपन्यांसमोर मोठी आव्हानं उभी करायला सुरुवात केली आहे. या कंपन्यांचा विस्तार वेगाने होत आहे. त्यामुळे त्यांनी आपल्या उत्पादनांच्या श्रेणीतही वाढ केली आहे.

काही मोठ्या कंपन्यांनी या नवीन तंत्रज्ञानाचं भवितव्य ओळखून गुंतवणूक करायचं ठरवलं आहे. मेरिकोने नायका या कंपनीत गुंतवणूक करून त्यांचे काही समभाग घेतले आहेत, तर कोलगेट पामोलिव्हने बाँबे शेव्हिंग कंपनीमध्ये गुंतवणूक केली आहे. इमामीने द मॅन कंपनीमध्ये तर युनिलिव्हरने प्लमम या कंपनीत गुंतवणूक केली आहे. व्हेंचर कॅपिटल कंपन्या म्हणजेच व्यावसायिक तत्त्वावर गुंतवणूक करणा-या कंपन्यांनीही या क्षेत्रावर लक्ष केंद्रित केलं आहे. या कंपन्यांच्या मते, कस्टमायझेशन केवळ लक्झरी ब्रँड्स आता सर्वसामान्य ग्राहकांसाठीही हे होऊ लागलं आहे. आता या क्षेत्रात अनेक नव्या कंपन्या प्रवेश करत असल्या तरी योजनेची अंमलबजावणी कशा प्रकारे करतात, यावर त्यांचं भवितव्य अवलंबून आहे.

प्रत्येक ग्राहकासाठी वेगळं उत्पादन तयार करून आपलं वचन निभावण्यात त्यांचा खरा कस लागेल. अर्थात आजची तरुण पिढी या कंपन्यांसाठी योग्य ग्राहक आहे. या पिढीला स्वत:साठी बाजारात वेगळं काही तरी तयार होत असल्याचं विशेष समाधान असतं. कंपन्यांनाही याद्वारे त्यांच्याशी चांगले बंध निर्माण करण्याची संधी मिळते. त्यात या कंपन्यांनी नैसर्गिक, रसायनविरहित आणि ऑरगॅनिक उत्पादनं दिली, तर ते ग्राहकांना हवंच आहे. फक्त लाखो ग्राहकांसाठी अशी युनिक उत्पादनं तयार करताना कंपनी स्वत:ची आयडेंटिटी विसरणार नाही, याची काळजी घ्यावी लागेल.

# वास्तव गावाकडच्या आईचं..

गावाकडच्या ब-याचशा बायकांना आज सुनाच मिळत नाहीत. पोटची मुलं तिशी-पस्तिशी ओलांडायला आली तरी बायकोच मिळू शकत नाहीत. बरं, हवी तशीच नाही तर, विधवा, परित्यक्ता सूनही मिळवणं गावपातळीवर अवघड बनू लागलं आहे. जातीबाहेरचीच काय पण पैसे देऊनही सुना मिळत नाहीत, हे वास्तव ठरू लागलंय. वीस वर्षांपूर्वी अहमहमिकेने घडवलेले मुलींचे गर्भपात आता मोठा सामाजिक भस्मासूर म्हणून समोर उभे ठाकले आहेत..

गावाकडचं वास्तव शब्दात मांडायचं झाल्यास सुरुवात आजपासून किंवा ङ्गआईफ्पासून करावी लागेल! म्हणून आजच्या आईपासून कानोसा घ्यायचं म्हटल्यास गावाकडची आजची आई भलतीच थकलीय, हे वास्तव समजून घ्यायची गरज आहे. होय, गावाकडच्या सगळ्याच आया पुरत्या थकल्याहेत. खरं तर हे त्यांचं थकण्याचं वय नाही आणि त्याही थकल्याच नसत्या; जर नेहमीप्रमाणे या वयात त्यांच्या हाताखाली सुना आल्या असत्या. कारण, कसंही झालं तरी पन्नाशी लागण्यापूर्वीच चाळीस-पंचेचाळीशीत घरात सून यायची. ती आली म्हणजे बरीच कामं, जबाबदा-या सांभाळू लागायची. म्हणजे लग्न लागलं तसं मानगुटीवर लादलेलं संसाराचं ओझं ती आल्यानंतर हमखास हलकं व्हायचं. किमान घर तिच्या भरवशावर टाकून काही काळ मोकळं होता यायचं. किमान स्वयंपाक, धुणीभांडी, घरातलं, शेतातलं बरंचसं काम तिच्यामुळे मार्गी लागायचं. जीवावरचा, देहावरचा बराचसा भार बिनदिक्कत तिचा व्हायचा. परंपरा म्हणून किंवा प्रेम म्हणून.. अलीकडे मात्र मुलं चाळिशीला येऊ घातली, पण सुना नशिबी येईनात. म्हणून घरातलं, दारातलं, शेतातलं सगळं पन्नाशीकडे सरकणा-या बिचा-या आयांनाच निस्तारावं लागतंय. त्यामुळे त्यांची कमालीची दमछाक होतेय. पण बिचा-या करणार तरी काय? गावाकडच्या ब-याचशा बायकांना सुनाच मिळत नाहीत. पोटची मुलं तिशी-पस्तिशी ओलांडायला आली तरी बायकोच मिळू शकत नाहीत. बरं, हवी तशीच नाही तर, कशीही असली तरी तयारी आहे. बिनलग्नाची नाही तर विवाहित, विधवा, परित्यक्ता अशी कुणीही चालू शकते. जातीबाहेरचीच काय पण पैसे देऊनही सुना मिळत नाहीत, हे वास्तव ठरू लागलंय. नोकरीशिवाय घरी राहून गेलेली किती तरी मुलं घरोघरी आहेत. तरी बरं, कोणी शेती करतो, कुणी मोलमजुरी करतो, कोणी धंदा-व्यवसाय करतोय. काही आहेतही रिकामे, नालायक; पण येनकेनप्रकारेन चांगल्यापैकी रोजीरोटीला लागलेल्या आणि शिकून-सवरूनही फक्त नोकरी न लागल्याने इतर कामं करणा-या हजारो मुलांना सध्या बायको म्हणून मुलीच मिळत नाहीत. त्यामुळे त्यांच्या आयुष्याचं काय मातेरं होत असेल हा प्रश्न वेगळा! तूर्तास मात्र बिचा-या आईची स्थिती अवघड झालीय. एकतर दिवसागणिक वय लोटलं जाताना नाना यत्न-प्रयत्न करूनही लग्न होत नसल्याने वैफल्यग्रस्त होत जाणा-या पोटच्या लेकराचं दु:ख सहन होत नाहीच. पण दुसरीकडे घरादारातला रोजचा कामधंदा आवरण्यासाठीही कुणी मदतीला नसल्याने या सर्व आयांच्या हालअपेष्टांचं प्रमाणही वाढत्या वयासोबत वाढत चाललं आहे. जात कोणतीही असो, कुटुंबाचा धंदा, व्यवसाय कोणताही असो, परिस्थिती गरिबीची असो वा श्रीमंतीची; कुठलाच भेदाभेद न करता हे वास्तव गावाकडच्या जवळपास सगळ्याच आयांना सरसकट लागू पडतंय

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# पोलिस दलात खळबळ; बदलीसाठी अंमलदाराकडे ३५ लाखांची मागणी, दोघांविरुद्ध गुन्हा दाखल

**नाशिक:** नाशिक पोलिस आयुक्तालयातील भद्रकाली पोलिस ठाण्याच्या दुय्यम निरीक्षकाची इंदिरानगर पोलिस ठाण्यात नेमणूक करण्यासाठी तब्बल पस्तीस लाख रुपयांची खंडणी मागितल्याचा धक्कादायक प्रकार उघड झाला आहे. याबाबत नाशिकरोड पोलिस ठाण्याच्या अंमलदाराने मुंबई नाका पोलिसांत दिलेल्या फिर्यादीवरून दोन संशयितांविरुद्ध सोमवारी (दि.२८) गुन्हा नोंदविण्यात आला आहे. त्यामुळे पोलिस दलात खळबळ उडाली असून, एकाला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. पोलिस आयुक्तालयातील सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, नाशिकरोड पोलिस ठाण्यातील एका अंमलदाराच्या फिर्यादीनुसार नितीन सपकाळे व सागर पांगरे-पाटील या दोन संशयितांविरुद्ध खंडणीचा गुन्हा नोंद आहे. २४ जुलै रोजी रात्री अकरा वाजेच्या सुमारास संशयित सपकाळे याने पाटीलसोबत संगनमत



करून अंमलदाराला ङ्गव्हॉटसअ‍ॅप कॉलफ केला. त्यावेळी संशयिताने ङ्गआपली वरपर्यंत ओळख असून, भद्रकालीचे सध्याच्या दुय्यम निरीक्षकांची इंदिरानगर पोलिस ठाण्यात ङ्गप्रभारीफ पदावर बदली करून देतो. त्यासाठी प्रत्यक्ष भेटून बोलूफ, असे सांगितले. २५ जुलै रोजी सकाळी साडेदहा वाजता सपकाळे चांडक सर्कल परिसरात आला. त्याने अंमलदारासह निरीक्षकांना बोलावून घेतले. त्यावेळी चुंचाळे पोलिस ठाण्यात दोन अंमलदारही हजर होते. त्यावेळी संशयित पाटील हा ङ्गतुम्ही पैसे दिले नाहीत, तर मी कोठेही चांगल्या ठिकाणी बदली होऊ देणार नाहीफ, असे सांगून निघून गेला.त्या दिवशी रात्री सव्वाआठ वाजता सपकाळेच्या मोबाइलवर अंमलदाराने फोन करून ङ्गरेकॉर्डिंगफ केली. तेव्हा ङ्गदुसरे निरीक्षक पस्तीस द्यायला तयार आहेत. मी पाच कमी करतो. तीसपेक्षा कमी होणार नाही. जर साहेब पंचवीसच्या वर द्यायला तयार नसतील, तर बदलीचे काम होणार नाहीफ, असा दावा सपकाळेने केला. त्यावरून अंमलदाराने पुराव्यांनिशी पोलिस ठाणे गाठत फिर्याद दिली आहे. या प्रकारानंतर मुंबई नाका पोलिसांनी एका संशयिताला ताब्यात घेतले असून, तो बांधकाम व्यवसाय क्षेत्राशी संलग्न असल्याचे कळते. दरम्यान, या प्रकाराबाबत पोलिस आयुक्तालयाने कमालीची गोपनीयता बाळगली असून, पोलिस दलातील काहीजण याप्रकरणात सहभागी आहेत का, यासंदर्भातही तपास सुरू आहे.पोलिस आयुक्तांनी महिन्याभरापूर्वीच शहरातील सात पोलिस ठाण्याच्या ङ्गप्रभारीफ निरीक्षकांची बदली केली आहे. त्यानुसार नवीन निरीक्षकांनी पोलिस ठाणेनिहाय कामगिरींना सुरुवात केली असून अंमलदारांच्याही बदल्यांची ङ्गसेटिंगफ अद्याप सुरू आहे. त्यातच पोलिस ठाणे, गुन्हे शाखा, पथकांतील ङ्गकलेक्टरांफमध्ये झालेले मतभेद चव्हाट्यावर आले असून, वरिष्ठ निरीक्षकांचेही ङ्गमनोमिलनफ अद्याप सुरूच आहे. त्यातच एका निरीक्षकाच्या बदलीसाठी थेट पस्तीस लाखांची मागणी होणे, त्यातच काही अधिकाऱ्यांच्या ङ्गमर्जीतल्याफ अंमलदाराला संपर्क साधला जाणे, संशयितांना भेटण्यासाठी जाणारे अंमलदारही ङ्गमर्जीतलेफ असणे, हा प्रकारही संशयास्पद आहे. त्यामुळे आयुक्तालयाने याप्रकरणी सखोल तपासाला सुरुवात केल्याचे कळते.

# म्हाडाला अधिकाऱ्यांच्या मनमानीचा फटका; या इमारतींबाबत मुंबई हायकोर्टाचा मोठा निर्णय

**मुंबई :** मुंबईतील धोकादायक उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाची ङ्गरखडपट्टीफ दूर करण्याच्या उद्देशाने राज्य सरकारने म्हाडा कायद्यातील दुरुस्तीद्वारे २ डिसेंबर २०२२पासून रहिवाशांनाच प्रकल्प राबवता येईल, असा मार्ग खुला केला. मात्र, कायदादुरुस्तीद्वारे मिळालेल्या अधिकारांचा म्हाडाच्या अधिकाऱ्यांकडून मनमानी व अवैध वापर होत असल्याचे पाहून मुंबई उच्च न्यायालयाने सोमवारी महत्त्वाचा आदेश दिला. त्यामुळे राज्य सरकार व म्हाडाला मोठा झटका बसला आहे. तसेच म्हाडाच्या चुकीच्या पावलांमुळे या योजनेलाच एकप्रकारे खीळ बसली आहे.म्हाडा कायद्याच्या कलम ७९-अ अन्वये ९३५ पुनर्विकास प्रकल्पांविषयी नोटिसा देण्यात आल्या. या सर्व नोटिसांची वैधता व त्यामागील कारणे यांचा शोध घेण्यासाठी न्या. गिरीश कुलकर्णी व न्या. आरिफ डॉक्टर यांच्या खंडपीठाने उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती जे. पी. देवधर व निवृत्त प्रधान जिल्हा न्यायाधीश विलास डोंगरे यांची द्विसदस्यीय समिती नेमली आहे.

या नोटिसा देण्यामागची कारणे काय व हेतू काय? यासंदर्भात ५ डिसेंबर २०२४ रोजी प्रमाणित मार्गदर्शक प्रणाली (एसओपी) आखून देण्यामागचा म्हाडा उपाध्यक्षांचा हेतू काय व त्याविषयी त्यांचे अधिकार काय? याविषयी तपासणी करून शक्यतो सहा महिन्यांत अहवाल द्यावा, असे निर्देश खंडपीठाने समितीला दिले आहेत.याचबरोबर ङ्ग९३५पैकी ४६ नोटिसा मागे घेण्याची कार्यवाही यापूर्वीच सुरू केली आहे. उर्वरित ८८९ नोटिसा स्थगित ठेवल्या जातील आणि त्यात पक्षकारांच्या संमतीविना पुढची कोणतीही कार्यवाही केली जाणार नाहीफ, अशी हमी देणेही म्हाडाला भाग पडले असून त्याची नोंद खंडपीठाने या आदेशात केली आहे. शिवाय ङ्गम्हाडाकडून स्वत:हून स्थगिती होणाऱ्या नोटिसांमध्ये याचिकाकर्त्यांनी आव्हान दिलेल्या नोटिसांचा समावेश नसल्यास त्या स्थगित राहतीलफ, असेही खंडपीठाने या अंतरिम आदेशात स्पष्ट करून सर्व कायदेशीर मुद्द्यांबाबत पक्षकारांना प्रतिज्ञापत्रांवर उत्तर दाखल करण्यास सांगितले आहे. हा आदेश स्थगित ठेवण्याची म्हाडाची विनंतीही खंडपीठाने फेटाळून लावली.महापालिका कायद्याच्या कलम ३५४ अन्वये मुंबई महापालिकेने किंवा म्हाडाच्या सक्षम प्राधिकाऱ्याकडून इमारत धोकादायक जाहीर झाली तर त्याविषयीच्या नोटीसनंतर तीन महिन्यांच्या आत इमारत मालकाने पुनर्विकास प्रकल्प हाती घेणे बंधनकारक आहे. तसे झाले नाही तर किमान ५१ टक्के रहिवाशांच्या संमतीसह पुनर्विकास प्रकल्पाचा प्रस्ताव देण्यासाठी इमारत मालकाला सहा महिन्यांची नोटीस द्यायची. त्या कालावधीतही त्याने काही केले नाही तर रहिवासी/भाडेकरूंच्या प्रस्ताविक सहकारी गृहनिर्माण संस्थेला ५१ टक्के रहिवाशांच्या संमतीने स्वत: प्रकल्प राबवण्याचा प्रस्ताव देता येईलफ, असे ङ्गकलम ७९-अफद्वारे स्पष्ट करण्यात आलेले आहे.

म्हाडाचे कार्यकारी अभियंताच अधिकार नसताना इमारत धोकादायक ठरवत आहेत. अशाप्रकारे मनमानी सुरू असून इमारत मालक व रहिवासी/भाडेकरू यांच्या घटनात्मक व वैधानिक हक्कांचे उघड उल्लंघन होत आहे. असा युक्तिवाद ज्येष्ठ वकील नरेंद्र वालावलकर व एम. एम. वशी यांनी अनेक याचिकाकर्त्यांतर्फे मांडला.

# उद्धव ठाकरेंनी केला एबी फॉर्मचा सौदा; मातोश्रीचं वास्तव म्हणत रामदास कदमांची जहरी टीका

**रत्नागिरी:** शिवसेना शिंदे गटाचे नेते रामदास कदम यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून कोकणातील रत्नागिरी जिल्ह्यात खेड येथे स्वर्गीय मीनाताई ठाकरे नाट्यगृहाचे नूतन इमारतीचे उद्घाटन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात आलं. त्यावेळी रामदास कदम यांनी आमदार अशोक पाटील यांची व्यासपीठावरती एन्ट्री होताच कदम यांनी उद्धव ठाकरे यांनी केलेल्या एबी फॉर्म चा सौदा केला असा आरोप करत थेट ठाकरेंवर बोचरी टीका केली आहे कलमनी हा सांगितलेला किस्सा मोठा चर्चेचा विषय ठरला आहे. रामदास कदम यांचे भाषण सुरू असताना आमदार अशोक पाटील यांची एन्ट्री झाली त्यांचा उल्लेख रामदास कदम यांनी आपले आमदार आलेत असं म्हणून त्यांचे स्वागत केलं आमचे मुलुंडचे आमदार अशोक पाटील कोळी समाजाचा हा आमचा एक आमदार होता. पण मागच्या वेळेला यांच्या हातात दिलेले काय दिलं होतं तुमच्या हातात असंच थेट अशोक पाटील यांना विचारत पाटील म्हणाले एबी फॉर्म..., तुमच्या हातात एबी फॉर्म दिला आणि फोन आला एवढे तिकडून मिळाले एवढे आले काढून घेतला एबी फॉर्म यांचा, खरं की खोटं सांगा.. अहो तुमच्या एबी फॉर्म चा सौदा झाला की नाही येस ऑर नो असं रामदासभाईंनी थेट व्यासपीठावरून विचारताच अशोक पाटील क्षणार्धात म्हणाले हो झाला सौदा असं म्हणाले. नक्की ना असं विचारत थेट व्यासपीठावरूनच हा विषय उपस्थितांसमोरच अशोक पाटील यांना विचारून कदम पुढे म्हणाले की हे वास्तव आहे हे मातोश्रीच वास्तव आहे हे सांगतील अशोक पाटील साहेब याची नोंद सगळ्यांनी घ्या असा आखो देखा हाल असलेला किस्सा सांगत कदम यांनी थेट उद्धव ठाकरे यांच्यावर निशाणा साधला.याच उद्धव ठाकरेंनी अनिल परब यांच्या खांद्यावर बंदूक ठेवत खोटे- नाटे आरोप करण्याचे काम सुरू केला आहे संजय कदम आता पुन्हा स्वगृही आपल्याबरोबर आले आहेत तो माझा भाऊ आहे तो अजिबात चुकला नाही पण तो राष्ट्रवादीचा असताना योगेश कदम शिवसेनेचा आमदार असताना मागील निवडणुकीत यास उद्धव ठाकरे यांच्या बेडकाने एबी फॉर्म हे संजय कदम यांच्या हातात दिले तेव्हापासूनच उद्धव ठाकरे याने योगेश कदम याला राजकीय दृष्ट्या संपवण्याचा घाट घातला आहे असा आरोप रामदास कदम यांनी केला.

# डाक सेवांमध्ये डिजिटल क्रांती; आय.टी. २.० अप्लिकेशनचे कार्यान्वयन शनिवारी(२ ऑगस्ट) जिल्ह्यातील डाक सेवा बंद

जनसंचलन/बुलढाणा

भारतीय डाक विभाग आपल्या सेवा प्रणालीत आमूलाग्र सुधारणा घडवून आणण्यासाठी आय.टी. २.० या महत्त्वाकांक्षी उपक्रमांतर्गत एपीटी अप्लिकेशन ही नवीन डिजिटल प्रणाली कार्यान्वित करत आहे. या नव्या प्रणालीच्या अंमलबजावणीमुळे डाक व्यवहार अधिक जलद, अचूक आणि ग्राहकाभिमुख होणार असून, यामुळे पोस्ट ऑफिसमधील सेवा आणखी सक्षम होणार आहेत. बुलढाणा जिल्ह्यातील सर्व शाखा टपाल कार्यालये व उपडाकघरांमध्ये ही प्रणाली मंगळवार दि. ५ ऑगस्ट २०२५ पासून होणार होती. परंतु रक्षाबंधन सणामुळे नव्या प्रणालीची अंमलबजावणी आता सोमवार दि. ४ ऑगस्टपासून होणार आहे. या संक्रमणासाठी आवश्यक असलेल्या डेटाच्या स्थलांतराची प्रक्रिया सोमवार दि. ४ ऑगस्ट रोजी होणारी ती आता शनिवार दि. २ ऑगस्ट २०२५ रोजी पार पडणार आहे. नागरिकानी यांची नोंद घ्यावी. तसेच शनिवार दि.



२ ऑगस्ट रोजी बुलढाणा जिल्ह्यातील कोणत्याही पोस्ट ऑफिसमध्ये व्यवहार करता येणार नसल्याने नागरिकांनी महत्त्वाची कामे २ ऑगस्टपूर्वीच पूर्ण करावीत, जेणेकरून व्यवहारात अडथळा येणार नाही, अशी माहिती अधिक्षक डाकघर, बुलढाणा यांनी प्रसिद्धी पत्रकाव्दारे दिली आहे.

# हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र अभियानांतर्गत महिला व बाल विकास विभागाची वृक्ष लागवड मोहीम

जनसंचलन/बुलढाणा



हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र या अभियानाच्या अंतर्गत गुरुवार, २४ जुलै रोजी महिला व बाल विकास भवन, येथे वृक्ष लागवड करण्यात आली. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी अमोल डिघुळे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा उपक्रम पार पडला. या उपक्रमांतर्गत वर्ष २०२५ साठी राज्य शासनाने घेतलेल्या १० कोटी वृक्ष लागवड उद्दिष्टाचा एक भाग म्हणून एकूण २२ वृक्षांचे रोपण करण्यात आले. पर्यावरणसंवर्धन व हरित महाराष्ट्र घडवण्याच्या दृष्टीने ही कृती महत्त्वाची ठरत आहे. कार्यक्रमास विविध अधिकारी व कर्मचारी मोठ्या उत्साहाने उपस्थित होते. यामध्ये शासकीय मुलींचे बालगृह व निरीक्षणगृह अधीक्षक सुनिल वाठोरे, परिविक्षा अधिकारी श्रीकृष्ण इंगळे व उमेश निकम, संरक्षण अधिकारी रामेश्वर वसु, दिवेश मराठे यांचा सहभाग होता. जिल्हा बाल संरक्षण कक्षातील कर्मचारी तसेच चाईल्ड हेल्पलाइन समन्वयक सोहेप शेख व कनिष्ठ काळजी वाहक अजय सोनुने यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले

# सहकारी संस्था निवडणूक अधिकाऱ्यांचे तयार करणार पॅनल !

जनसंचलन/बुलढाणा




जिल्ह्यातील ई वर्गातील सहकारी गृहनिर्माण संस्था (२५० किंवा त्यापेक्षा कमी सदस्यसंख्या असलेल्या) निवडणुकांसाठी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांचे पॅनेल तयार करण्यात येणार आहे. यासाठी पात्र उमेदवारांकडून २१ ऑगस्टपर्यंत अर्ज मागविण्यात आले आहेत, अशी माहिती जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बुलढाणा यांनी दिली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून अर्ज करण्यासाठी शासकीय विभागातील किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेमधील कार्यरत वरिष्ठ लिपिक किंवा त्यावरील पदावरील अधिकारी-कर्मचारी, प्रमाणित लेखापरीक्षक, वकील तसेच शासकीय किंवा निमशासकीय सेवेतून निवृत्त झालेले (वय ६५ वर्षापेक्षा कमी असलेले) अधिकारी पात्र आहेत. विहित नमुन्यातील अर्ज जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बुलढाणा यांच्या कार्यालयात उपलब्ध आहेत. तसेच, अर्जाचे नमुने कार्यालयीन नोटीस बोर्डवरही पाहायला मिळतील. हे पॅनेल तयार केल्यामुळे सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या निवडणुका वेळेत, सुयोग्य व पारदर्शकपणे पार पाडता येणार आहेत. इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज विहित वेळेत संबंधित कार्यालयात सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले.

# राज्य परिवहन महामंडळ बुलढाणा विभागाचा उपक्रम....

## विविध पॅकेज टुर्सचे आयोजन:प्रवाशांनी लाभ घ्यावा

जनसंचलन/बुलढाणा

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बुलढाणा विभागातर्फे सर्व आगारांमधून पर्यटकांसाठी विशेष पॅकेज टुर्सचे आयोजन करण्यात आले आहे. या टुर्सचा जास्तीत जास्त प्रवाशांनी लाभ घ्यावा, असे आवाहन विभाग नियंत्रक तसेच विभागीय वाहतूक अधिकारी यांनी केले आहे. या पॅकेज टुर्स अंतर्गत एक दिवसापासून ते तीन दिवसांपर्यंतच्या देवदर्शन आणि पर्यटनस्थळांच्या भेटीचा समावेश आहे. प्रवाशांच्या मागणीनुसार ग्रुप बुकींगद्वारे ही सेवा राबविण्यात येणार असून, सर्व आगारांमधून नियोजित स्थळांकरिता वाहतूक सेवा उपलब्ध करून देण्यात येईल. एक दिवसांचे पॅकेज टुर्स : अजिंठा लेणी-वेरुळ घृष्णेश्वर-खुलताबाद-परत, शेगाव-चिखलदरा-परत, पैठण-परत. दोन ते तीन दिवसचे पॅकेज टुर्स: कपीलधार-तुळजापूर-अक्कलकोट-पंढरपूर-परत, आळंदी-देहू-भिमाशंकर-परत, शिर्डी-शनिशिंगणापूर-देवगड-परत, औंढा नागनाथ-परळी वैजनाथ-परत, नाशिक-वणी सप्तशृंगी-त्र्यंबकेश्वर-परत, मुक्ताईनगर--परत. याशिवाय प्रवाशांच्या विशेष मागणीनुसार मध्यप्रदेशातील ओंकारेश्वर व उज्जैन या प्रसिद्ध तीर्थक्षेत्रांसाठी देखील वाहतूक सेवा पुरविण्यात येईल. या पॅकेज टुर्सची माहिती, शुल्क, प्रवासाचे वेळापत्रक, बुकिंग प्रक्रिया इत्यादी तपशीलासाठी आपल्या नजीकच्या एस. टी. आगारास भेट देऊन सविस्तर माहिती घ्यावी असे आवाहन करण्यात आले आहे.




# सोशल मीडियावर आक्षेपार्ह पोस्ट प्रकरणी ४ जणांविरुद्ध पो.स्टे.ला गुन्हा दाखल...

जनसंचलन/ जळगाव जामोद

सोशल मीडियाद्वारे तसेच प्रसार माध्यमांवर शिवीगाळ करून बदनामी केली तसेच जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी जळगाव जामोद पोलीस स्टेशनला चार जणांना विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दिनांक २६ जुले रोजी संध्याकाळी साडेसात वाजेच्या सुमारास जळगाव जामोद येथे ठेकेदारीचा व्यवसाय करणारे गजानन जगदेवराव सरोदे राहणार पळसखेड हल्ली मुक्काम जळगाव जामोद वय ६३ यांनी जळगाव जामोद पोलीस स्टेशनला येऊन तक्रार दिली किशोर रौदळे रा.वरवट बकाल, विशाल विनोदराव बकाल (ऊर्फ ट्रिपल व्ही बकाल, योगेश कोल्हे,अजय हरिभाऊ पारस्कर यांनी मला प्रसार माध्यमाद्वारे



शिवीगाळ, बदनामी तसेच जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या प्रकरणी तक्रार दिली त्यांच्या तक्रारीवरून वरील चौघांविरोधात जळगाव जामोद पोलीस स्टेशनला अप क्र-३६४/२०२५ कलम २९६,३५६(२),३५१(२) भारतीय न्याय संहितेनुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास ठाणेदार श्रीकांत निचळ यांच्या मार्गदर्शनात पीएसआय नारायण सरकटे करीत आहेत.

# मेहकर येथे २९ जुलैला विशेष मासिक शिबीर..

जनसंचलन/बुलढाणा

मोटार वाहन चालक व मालक यांच्या सोयीसाठी तसेच स्थानिक मोटार ड्रायव्हिंग स्कूलच्या मागणीनुसार परिवहन विभागामार्फत मंगळवार दि. २९ जुलै रोजी मेहकर तालुक्यात विशेष अतिरिक्त मासिक शिबीर दौरा आयोजित करण्यात आला आहे. या शिबिराचा वाहन चालक व मालकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी केले आहे. अतिरिक्त शिबिरांमध्ये वाहन कर वसुली, मोटार वाहन नोंदणी, वाहन तपासणी, तसेच वाहन चालक अनुज्ञप्ती संबंधित सर्व कामकाज करण्यात येणार आहे. या शिबिरात मोटार वाहन निरीक्षक उपस्थित राहून संबंधित कामकाजाचे निराकरण करतील, त्यामुळे वाहनधारक, चालक व ड्रायव्हिंग स्कूल संचालकांनी याचा लाभ घ्यावा. सर्व संबंधितांनी या शिबिराची नोंद घेऊन आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहावे, असे आवाहन परिवहन विभागाने केले आहे.




# मोताळा नगराध्यक्ष माधुरी देशमुख यांच्यासह इतरांना अटकपूर्व जामीन मंजूर!

## नगराध्यक्षांच्या जामीनासाठी ॲड शर्वरी सावजी -तुपकरांचा युक्तीवाद!

जनसंचलन/ लोणार

मोताळा येथे सौर ऊर्जा प्रकल्प उभारणीसाठी बनावट ठराव व बनावट ना हरकत प्रमाणपत्र सादर करून शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी मोताळा नगराध्यक्ष माधुरीताई देशमुख यांच्यासह इतर चौघाविरुद्ध बोराखेडी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला होता. दरम्यान आपल्याला अटक होऊ नये यासाठी अटकपूर्व जामीन मिळावा म्हणून माधुरी देशमुख यांनी ॲड. शर्वरी सावजी -तुपकर यांच्यामार्फत न्यायालयात जामीनासाठी अर्ज केला होता. ॲड. शर्वरी सावजी -तुपकर यांनी याप्रकरणी न्यायालयात केलेल्या प्रभावी युक्तिवादामुळे माधुरी देशमुख यांचा अटकपूर्व जामीन मंजूर झाला आहे. मोताळा येथे सौर प्रकल्प उभारायच्या दृष्टीने पॉवर इंडिया व्हेंचर्स प्रा. लिमिटेड या कंपनीला नगर पंचायतीचा बनावट ठराव व मुख्याधिकारी गणेश पांडे यांची बनावट सही शिक्का असलेले ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आल्याचा आरोप,व यामुळे नगरपंचायतीचा दहा लाखाहून अधिक विविध स्वरूपाचा कर बुडाला. बनावट कागदपत्रे तयार करण्यासह शासनाचा महसूल बुडवून फसवणूक केल्याप्रकरणी मोताळा नगर पंचायतीच्या नगराध्यक्षा श्रीमती माधुरी पुरुषोत्तम देशमुख यांच्या सोबतच स्वीकृत नगर सेवक अमोल देशमुख, नगर पंचायतचे कर्मचारी सुनील मिरकुटे व कंपनीचे कर्मचारी महेश सहाणे , शांताराम लोखंडे यांचे विरुद्ध बोराखेडी पोलीस स्टेशन येथे भा दं वि चे कलम ४२०, ४६७, ४६८ ३४ अन्वये बोराखेडी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक बालाजी डशेंगेपल्लू यांचे फिर्यादीवरून गुन्हा नोंदविण्यात आलेला होता. बोराखेडी पोलिसांनी या सर्वांना अटक करण्याची तयारी चालवली होती. परंतु नगराध्यक्षा माधुरीताई देशमुख व इतर सर्व आरोपी गुन्हा दाखल झाल्या पासून भूमिगत होते. आपल्यावर झालेली ही कारवाई राजकारणातून आणि आकसापोटी झाल्यामुळे सर्वांनी मलकापूर येथील अतिरिक्त सत्र न्यायालयात अटकपूर्व जमानत मिळणे करीता धाव घेतली होती. दरम्यान या प्रकरणी २८ जुलै रोजी अतिरिक्त सत्र न्यायाधीश पी. बी. जाधव यांच्यासमोर सुनावणी झाली. माधुरी देशमुख यांचेसाठी ॲड शर्वरी सावजी- तुपकर यांनी अभ्यासपूर्ण मांडणी करून बनावट ना हरकत प्रमाणपत्राशी माधुरीताई देशमुख यांचा काही संबंध नसून राजकीय वैमनस्यातून त्यांना ह्यात गोवण्यात आले आहे ह्याकडे मा. न्यायालयाचे लक्ष वेधले अनेक प्रभावी मुद्दे मांडून ताकदीने बाजू मांडली, तो युक्तीवाद ग्राह्य धरत मा. न्यायालयाने नगराध्यक्षा माधुरी देशमुख यांना सशर्त अटकपूर्व जमानत मंजुर केली आहे. तसेच या प्रकरणातील इतर आरोपी असलेले स्वीकृत नगर सेवक अमोल देशमुख, नगर पंचायत मोताळाचे कर्मचारी सुनील मिरकुटे व कंपनीचे कर्मचारी महेश सहाणे , शांताराम लोखंडे यांचेसाठी वेगवेगळ्या वकिलांनी काम पाहिले. याही आरोपिंना न्यायालयाने सशर्त अटक पूर्व जामीनमंजूरकेलाआहे.

# धर्म विचारून नग्न करून दलित तरुणाला मारणाऱ्यांना मोक्का लावा!



जनसंचलन/ खामगाव

खामगाव येथे रोहन पैठणकर या दलित तरुणाला तीन जणांनी मारहाण केल्याने त्याचा निषेध वंचित बहुजन आघाडी कडून खामगाव शहर बंदचे आवाहन करण्यात आले होते.त्या आव्हानाला प्रतिसाद देत शहरातील व्यापारी व शहरवासीयांनी प्रतिसाद देत आपली प्रतिष्ठाने वैद्यकीय सेवा वगळता बंद ठेवण्यात आली आहे. रोहन पैठणकर (वय २१ ) यास जातीयवादी समाजकंटकांनी चौकातून उचलून नेऊन अपहरण केले व त्यास खामगावच्या काँग्रेस मैदानावर अमानुष मारहाण केली व त्याचा धर्म विचारून त्याला विवस्त्र करत अमानुषपणे मारहाण केली. त्याचेवर गाय चोरीचा खोटा आड घेतला त्याचे मारहाणीचे आरोपींनी व्हिडिओ काढून स्वतःच प्रसारण केले ही बाब सबंध महाराष्ट्रा च्या पुरोगामीत्वाला कलंकित करणारी आहे.सदर अमानवीय घटनेचा जाहीर निषेध करित सदर घटनेच्या निषेधार्थ आज खामगाव बंदची हाक देण्यात आली होती. दरम्यान आज खामगावातील व्यापारी व शहरवासी यांनी

# मनरेगा अंतर्गत गोठा व विहीरीच्या प्रस्तावांना तत्काळ मंजुरात द्या!

जनसंचलन/बुलढाणा

मनरेगा अंतर्गत गोठा व विहीरीच्या प्रस्तावांना विलंब न करता तातडीने मंजुरात देण्यात यावी व घरकुलाचे अनुदानही तातडीने द्यावे, अशी मागणी क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे नेते आकाश माळोदे यांनी बुलढाणा पंचायत समितीचे गट विकास अधिकारी एस.डी. तायडे यांच्याकडे केली. या संदर्भात आकाश माळोदे यांनी आज दि.२८ जुलै २०२५ रोजी बुलढाणा पंचायत समितीचे गट विकास अधिकारी श्री.एस. डी. तायडे यांची भेट घेतली. बुलढाणा तालुक्यात मोठ्या प्रमाणात शेतकरी मनरेगा अंतर्गत विहिर व गोठा करण्यास इच्छुक आहेत, परंतु सदर प्रक्रियेला मोठ्या प्रमाणात विलंब होतो व काही ग्रामविकास अधिकारी प्रस्ताव सादर करण्यास टाळाटाळ करतात त्यामुळे शेतकरी या योजनेपासून वंचित राहत आहेत. तरी सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन मिळावे याकरिता सदर योजनेची संपूर्ण माहिती ग्रामपंचायत कार्यालयात लावण्यात यावी व जे शेतकरी यासाठी अर्ज करतील त्या पात्र शेतकऱ्यांचे प्रस्ताव तातडीने पंचायत समिती कार्यालयाला पाठविण्याच्या सूचना आपल्या स्तरावरून सर्व ग्रामविकास अधिकारी यांना देण्यात याव्या. त्याचबरोबर पंचायत समिती कार्यालयाकडे प्राप्त झालेल्या गोठा व विहीरीच्या प्रस्तावांना कोणताही विलंब न करता तातडीने मान्यता देण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली. तसेच घरकुलाचे मस्टर प्रक्रियेला उशीर होत असल्याने अनुदान मिळण्यास उशीर होतो, त्यामुळे घरकुलाचे अनुदान तातडीने



मिळावे, अशी मागणीही त्यांनी लावून धरली, त्यावर तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना गट अधिकारी श्री.तायडे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. जर या संदर्भात कार्यवाही झाली नाही तर या विषयाला आक्रमक आंदोलन करण्यात येईल असा इशारा आकाश माळोदे यांनी दिला आहे. यावेळी पळसखेड नाईक चे सरपंच अमोल इंगळे, अजबराव तायडे व इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८